सकाळ

एप्रिल २०२५

किंमत ₹ १२

NiE NEWSPAPER IN EDUCATION

चित्र : कपिल घोलप

शिवछत्रपतींचे जलसामर्थ्य

दोस्तांनो, तुम्हालाही सुट्टीत विविध ठिकाणी फिरायला जायला आवडत असेल ना! तुमच्या फिरण्याच्या 'बकेट लिस्ट'मध्ये गड-कोटांचा समावेश आवर्जून करा. त्यामुळे तुम्हाला खूप नवीन गोष्टी पाहायला मिळतील. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, दृष्टिकोन आणि विचार किती व्यापक होता, हेही कळेल. त्यामुळेच समर्थ रामदासस्वामींनी महाराजांना गडपति, भूपती याबरोबरच 'जळपति' असं म्हटलं! महाराजांचे आरमार आणि त्यांचे जलदुर्ग याबाबतची माहिती आपण घेऊया!

- अनिकेत यादव
aniketyadav84@gmail.com

जंजिऱ्याचा सिद्दी

मुलांनो, तुम्ही इतिहासाच्या पुस्तकात 'जंजिऱ्याचा सिद्दी' असं वाचलं असेल. आफ्रिका खंडातील ॲबिसीनिया (सध्याचा इथिओपिया देश) प्रांतातून गुलाम म्हणून आलेले हे काटक लोक भारतातील विविध ठिकाणी कामास होते. ज्या प्रांतातून हे लोक आले आहेत, त्या प्रांताला आपल्याकडे 'हबसाण' आणि या लोकांना 'हबशी' असे म्हटले गेले. निजामशाहीचा वजीर मलिक अंबर हादेखील हबशी म्हणजे गुलाम म्हणूनच येथे आलेला होता. परंतु, तो स्वकर्तृत्वाने निजामशाहीचा वजीर झाला. त्याने १६१७ मध्ये 'सिद्दी अंबर हबशी सानक' यांस जंजिरा किल्ल्याचा कारभार सोपवला. पुढे याच सिद्द्यांच्या वारसांनी इतक्या चिवटपणे आपल्या संस्थानाचे रक्षण केले की, तब्बल ३३१ वर्षे त्यांना कोणीही येथून हटवू शकले नाही. अगदी एप्रिल १९४८ पर्यंत स्वतंत्र भारतात सामील होईपावेतो.

आरमार उभारणी व सिद्दीचा बंदोबस्त

- छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या काही कारणांसाठी आरमाराची उभारणी केली त्यांपैकी सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे 'सिद्दी'. सिद्दी प्रचंड लूटमार करायचा, गावेच्या गावे बेचिराख करायचा, अनेकांची गुलाम म्हणून विक्री करायचा.
- सिद्दीविरुद्ध लढण्यासाठी स्वतःचे आरमार, लढाऊ जहाजे, समुद्री किल्ले हवेत, जहाजबांधणीसाठी गोदी (डॉकयार्ड) हवी. २४ ऑक्टोबर १६५७ रोजी ऐन दिवाळसणात शिवाजी महाराजांनी कल्याण-भिवंडी जिंकली आणि कल्याणच्या खाडीत जहाजबांधणीची गोदी उभी राहिली. गोदीच्या संरक्षणासाठी दुर्गाडी नावाचा किल्लाही उभारला.
- मराठ्यांच्या पहिल्या जहाजाची निर्मिती या ठिकाणी झाली आणि आरमाराची मुहूर्तमेढ रोवली गेली. हा अलौकिक विचार करताना महाराजांचे वय अवघे २७ वर्षे आहे बरं का! याच दूरदृष्टीच्या विचारामुळेच शिवाजीराजांना 'भारतीय नौदलाचे जनक' (फादर ऑफ इंडियन नेव्ही) म्हणून गौरविले जाते.

नौदलाची उभारणी

छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमाराच्या निर्मितीचा विचार केला मात्र त्यासाठीचे तंत्रज्ञ त्यांच्याकडे नव्हते. पोर्तुगीज कारागीर रुई लेंताव्ह व्हियेंगश, त्याचा मुलगा फर्नांव्ह आणि त्यांच्या हाताखालील लोक घेऊन महाराजांनी नौदल निर्मितीस प्रारंभ केला.

१६५९

मध्ये पहिली नौका तयार झाली आणि मग पुढे १६६५ पर्यंत लहान-मोठी मिळून शंभर एक जहाजे बांधून तयार झाली.

८

फेब्रुवारी १६६५ मध्ये महाराजांनी कर्नाटक प्रांतामध्ये असलेल्या 'बसरूर' व सभोवतालच्या व्यापारी पेठांवर मोहीम काढली.

राजे स्वतः नौदलासह जहाजावर बसून तेथे गेले आणि अत्यंत कमी कालावधीत त्यांनी मोहीम फत्ते केली.

महाराजांचे सामर्थ्य

सिद्दीवर छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक वेळा स्वाऱ्या केल्या. त्याच्या ताब्यातील संपूर्ण भूप्रदेश जिंकून घेतला, पण समुद्री बेटावरील जंजिराच काय तो त्याच्या ताब्यात राहिला.

जंजिरा जिंकण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. असे असले तरी छत्रपती शिवाजी महाराज निराश झाले नाहीत. त्यांनी कारवारपर्यंतची संपूर्ण समुद्रकिनारपट्टी ताब्यात घेतली, समुद्री व्यापार वाढविला, भर समुद्रात बेटांवर अन् किनारपट्टीवर समुद्री किल्ले बांधले.

स्थानिक मावळ्यांना प्रेरणा दिली. मायनाक भंडारी, दर्यासारंग, दौलतखान, आंग्रे, धुळप यांनी आरमाराची ही मशाल प्रज्वलित ठेवली.

समुद्री व्यापार तर सोडाच, पण नुसते समुद्रावर जायचे जरी झाले तरी पोर्तुगीजांचे व अन्य युरोपियनांचे परवाने (कार्ताझ) घ्यावे लागायचे. शिवाजी महाराजांनी ही 'कार्ताझ' घेण्याची पद्धत बंद केली. स्वतःचे परवाने देण्यास सुरुवात केली.



दुर्गनिर्मिती

- छत्रपती शिवाजी महाराजांचे एक अलौकिक कार्य म्हणजे दुर्ग-निर्मिती. त्यांनी महाराष्ट्रातच नाही, तर मध्य प्रदेशपासून तमिळनाडूपर्यंतच्या विविध भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून किल्ले बांधले.
- दुर्गाडी, पद्मदुर्ग, सिंधुदुर्ग, खांदेरी, अलिबाग (कुलाबा), सामराजगड इत्यादी जलदुर्ग त्यांनी नव्याने उभारले, तर विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, रत्नदुर्ग, बाणकोट (हिम्मतगड), गोपाळगड, दाभोळचा किल्ला, जयगड, देवगड इत्यादी जलदुर्ग अधिक बळकट केले.
- काही ठिकाणी नुसत्या मोठ्या दगडांच्या राशी उभ्या कराव्यात तशी तटबंदी बांधली आहे, तर काही ठिकाणी दोन दगडांमध्ये इतके मजबूत मिश्रण वापरले आहे की, समुद्राच्या लाटांनी दगड झिजलेत पण मधले मिश्रण मात्र शाबूत आहे.
- विजयदुर्ग येथील आरमारी गोदी अवश्य पहावी अशीच आहे. भरतीचे पाणी आत आल्यावर पाण्याबरोबर नौका आत घेतल्या जात आणि गोदीच्या अरुंद मुखाशी असलेला दरवाजा लावून घेतला जाई. आत असलेल्या जहाजांची दुरुस्ती, सामानाची ने-आण झाल्यावर गोदीमुखाशी असलेला दरवाजा काढून नौका समुद्रात नेत असत.
- शत्रूच्या नौका किल्ल्याजवळ येऊ नयेत अथवा आल्याच तर त्या फुटून जाव्यात यासाठी शत्रूस दिसणार नाही अशा पद्धतीने समुद्रात दगडांची रास उभी केली जाई.

(लेखक इतिहासाचे अभ्यासक आहेत)



मुद्रक, प्रकाशक, संपादक
सम्राट अविनाश फडणीस

हा विशेषांक सकाळ मीडिया प्रा. लिमिटेडकरिता मुद्रक आणि प्रकाशक सम्राट अविनाश फडणीस यांनी सकाळ प्रिंटिंग प्रेस स. क्र. १५९/१६०, पुणे-सासवड रोड, लक्ष्मण वजनकाट्यामागे, उरुळी देवाची, पुणे ४१२३०८ येथे मुद्रित केले व सकाळ मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, ५९५, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ येथे प्रकाशित केले.

संपादक
सम्राट फडणीस

सहयोगी संपादक
महेश बर्दापूरकर

संपादकीय साह्य
मयूर भावे, संपदा सोवनी

मुखपृष्ठ
कपिल घोलप

अंकमांडणी
अविनाश लांडकर, सिद्धांत जोशी

अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखनातील मते ही त्या-त्या लेखकाची आहेत. संपादक, प्रकाशक, मुद्रक त्यांच्याशी सहमत असतीलच, असे नाही.

- संपादक

संपादकीय

करूया सुट्टीशी गट्टी!

'सकाळ एनआयई' हे मुलांसाठीचे वर्तमानपत्र गेली अनेक वर्षे ज्ञान आणि मनोरंजनाचा खजिना घेऊन दर आठवड्याला मुलांच्या भेटीसाठी येते आहे. यंदा उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आम्ही **'हॉलिडे बझ'** या खास विशेषांक घेऊन आलो आहोत.

मुले वर्षभर शाळा, अभ्यासक्रम, कोचिंग क्लास, हॉबी क्लास यांमध्ये गुरफटून गेलेले असतात. स्पर्धेच्या युगात या गोष्टी आवश्यक असल्या, तरी खेळ, अवांतर वाचन, घरी करण्यासारखे विज्ञानाचे प्रयोग याबद्दल मुलांना फारसे वाचायला किंवा करायलाही मिळत नाही. हल्ली सुट्टीमध्ये मुले मैदानी खेळांपेक्षा आपल्या मोबाईल फोनमध्ये किंवा टीव्हीच्या पडद्यासमोर व्यग्र असतात. त्याचवेळी पालक त्यांची नोकरी किंवा व्यवसाय आणि करिअरमध्ये आकंठ बुडालेले असतात. त्यामुळे मुलांची नक्की काय आणि कोणाबरोबर खेळायचे, काय वाचायचे, नक्की काय पाहायचे याबद्दल त्यांच्या मनात अनेक शंका असतात.

'एनआयई'च्या **'हॉलिडे बझ'**मध्ये आम्ही हाच विचार डोक्यात ठेऊन मुलांना नक्की काय वाचायला द्यावे, कोणत्या ॲक्टिव्हिटी करण्यासाठी द्याव्यात याचा सर्वंकष विचार केला आहे. या मध्ये प्रत्येकाचेच लाडके नायक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जलदुर्गांबद्दलची माहिती दिली आहे. महाराजांनी काळाच्या खूप पुढचा विचार करून जलदुर्गांची उभारणी केली आणि स्वराज्याचे तोरण अधिक भक्कम करून ठेवले होते. सुट्टीच्या काळात बाहेर ऊन आग ओकत असताना घरच्या घरी बिनखर्चिक उद्योग करावेत याची माहिती देऊन आम्ही मुलांची सुट्टी 'क्रिएटिव्ह' होईल, हे पाहिले आहे. गंमत म्हणजे, हल्ली 'आर्ट ऑफ डुईंग नथिंग', म्हणजेच काहीच न करणे याकडे सुद्धा एक कला म्हणून पाहिले जाते! अर्थात, त्याचही काही नियम आहेत व त्याबद्दलही आम्ही मुलांना व त्यांच्या पालकांना माहिती देत आहोत. याशिवाय हल्ली क्रिएटिव्हीटीबद्दलही खूप बोलले जाते. ती येते कोठून, ती विकसित करायची कशी हे मुलांना सांगण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. या शिवाय पालकांना सतावत असलेल्या मुले हल्ली अवांतर वाचन करतच नाहीत या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्नही आम्ही केला आहे. या व्यतिरिक्त पक्षी निरीक्षण, प्लॅस्टिकचा प्रवास, संगीत, काहीतरी वेगळे करून नाव कमावलेल्या मुलांच्या कथा, मुलांना नक्कीच आवडतील असे कार्टून्स, चित्र रंगवण्यापासूनच्या अनेक ॲक्टिव्हिटी असा भरगच्च मजकूर या अंकात आहे.

एकंदरीतच, या सुट्टीत काय वाचावे आणि नक्की काय करावे, या मुलांना व त्यांच्या पालकांना पडलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न म्हणजे 'सकाळ एनआयई'चा 'हॉलिडे बझ' या विशेषांकात केला आहे. या अंकातून मुलांना 'क्वालिटी टाइम' घालवण्यासाठी मदतच होईल, असा विश्वास आम्हाला आहे.

तेव्हा चला, करूया सुट्टीशी गट्टी...!